**MHNS240007332017**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०३.०६.२०१७ |
| नोंदणी तारीख | : | ०३.०६.२०१७ |
| निकाल तारीख | : | १३.०५.२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०८ ११ १० |
| निशाणी | : | ४० |

**सटाणा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

**ता. बागलाण, जिल्हा– नाशिक.**

(पिठासन अधिकारी – यु.पी. हिंगमिरे)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३१७/२०१७**

गुन्हा नोंद क्र.२/२०१७

**फिर्यादी/तक्रारदार** **महाराष्ट्र शासन**
**मार्फत सहाय्यक पोलीस निरीक्षक,**
जायखेडा पोलीस स्टेशन, ता.बागलाण.

**अभियोग पक्षातर्फे** सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री. ए.बी.महाजन.

**आरोपी** १. **गुलाब त्र्यंबक देवरे,** वय ५२ वर्षे,
२. **वंदना ऊर्फ शोभा गुलाब देवरे,** वय ४५ वर्षे,
दोन्ही रा. वडे खुर्द शिवार, ता.सटाणा, जि.नाशिक.

**आरोपींतर्फे विधीज्ञ** श्री. के. पी. भदाणे.

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०२.०१.२०१७ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ०२.०१.२०१७ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०२.०६.२०१७ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | १५.०४.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १३.०६.२०१९ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १३.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक, आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपींची माहिती

| आ.क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | अतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२. | गुलाब त्र्यंबक देवरे<br>वंदना ऊर्फ शोभा गुलाब देवरे | ०९.०१.२०१७<br>०९.०१.२०१७ | ०९.०१.२०१७<br>०९.०१.२०१७ | भादवी कलम ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | दिपक निंबा मोरे | पंच | १६ |
| २. | कृष्णा सोमसिंग देवरे | फिर्यादी | २० |
| ३. | पुंडलिक सोमसिंग देवरे | साक्षीदार | २६ |
| ४. | जिभाऊ सोमसिंग देवरे | साक्षीदार | ३० |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| –– | –– | –– | –– |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |

## न्यायनिर्णय
## (घोषणा तारीख – १३.०५.२०२६.)

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे चालविण्यात आला.

०२. **अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

फिर्यादी जिभाऊ सोमसिंग देवरे यांनी पोलीस स्टेशन जायखेडा येथे अशी फिर्याद दिली की, दि.०२.०१.२०१७ रोजी सकाळी वडे खुर्द ते भिमाशंकर धोदणपाडा जाणारे रोडवर दादाजी भिका आहिरे यांचे शेतातील रस्त्यावर सकाळी ०८.०० वा.च्या सुमारास घडला. फिर्यादीचे पुढे कथन की, फिर्यादी व त्याचे नातेवाईक यांचे रस्त्याचे वापराबाबत तहसिलदार, सटाणा यांचा आदेश झालेला आहे असे असतांना फिर्यादी हा हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल नं. एम.एच.४१, क्यु.१४६८ ही घेवुन ती वडे खुर्द ते भिमाशंकर धोदणपाडा रोडने त्याचे शेतातील इलेक्ट्रीक मोटार चालु करण्यासाठी जात असतांना आरोपींनी फिर्यादीची मोटरसायकल अडवुन रस्त्यात काटे टाकुन फिर्यादीस रस्त्याने जाण्यास हरकत अडथळा करुन मज्ञाव करुन वाईट साईट शिवीगाळ करुन दमदाटी केली.

**०३.** सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर २/२०१७ ने नोंदविली. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, तपास टिपणे नोंदविले आणि आरोपींना अटक केली व तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** या प्रकरणात माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींवर (निशाणी १३) द्वारे भा.द.वि कलम ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे अन्वये दोषारोप ठेवला व तो आरोपींना मराठीत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी त्यांचे वरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. आरोपींनी बचाव घेतला की, फिर्यादीने खोटी केस केली आहे.

०५. सदर प्रकरणामध्ये फिर्यादीने (निशाणी २९) समजुत पुरसीस व (निशाणी ३२) पुरावा बंद पुरसीस दाखल करुन त्यास जादा पुरावा देणे नाही, अशी पुरसीस दिल्याने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुद्ध कोणताही पुरावा आलेला नसल्याने त्याचे फौ.प्र.सं.कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

०६. अभिलेख, पुरावे व उभय बाजूंचे युक्तीवाद पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| <u>अ.नं.</u> | <u>मुद्दे.</u> | <u>निष्कर्ष.</u> |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ फिर्यादी हा त्याच्या शेतात इलेक्ट्रीक मोटर चालु करण्यासाठी जात असतांना त्याची मोटरसायकल अडवुन रस्त्यात काटे टाकुन फिर्यादीस रस्त्याने जाण्यास गैरनिरोध केला ? | **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय की, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ शांतता भंग करण्याच्या उद्देशाने फिर्यादीला शिवीगाळ केली व अपमानित केले ? | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय की, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरस्सरनार्थ फिर्यादीस धमकावले ? | **नकारार्थी.** |
| ४. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>युक्तिवाद</u>

०८. अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. महाजन आणि आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. के. पी. भदाणे यांचा युक्तीवाद ऐकला.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ करिता –**

०९. सर्व मुद्दे हे परस्पर संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन एकत्रीत केलेले आहे. फिर्यादी पंच दिपक निंबा मोरे (सा.क्र.१) याने त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, पोलीसांनी त्याला साधारण दोन वर्षांपूर्वी घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी जिभाउ देवरे यांच्या शेतामध्ये बोलाविले होते. त्यावेळी जिभाउ देवरे यांच्या शेतातून दादाजी अहिरे यांच्या शेतात जाणाऱ्या रस्त्यावर काटे टाकलेले होते. त्या रस्त्याच्या मध्यभागी एम.एच.४१, अे.क्यू.१४६८ क्रमांकाची मोटारसायकल उभी होती. सदर दक्षिण–उत्तर दिशेचा रस्ता काटे टाकल्यामुळे बंद होता. तसेच त्याला घटनास्थळाच्या चतुःसीमा सांगता येणार नाहीत असे कथन केले आहे.

१०. कृष्णा सोमसिंग देवरे (सा.क्र.०२) याच्या पुराव्यात असे आले की, फिर्यादी जिभाउ सोमसिंग देवरे हे त्याचे मोठे भाऊ आहेत. दि.०२.०१.२०१७ रोजी सकाळी सुमारे ८.०० वाजता श्रीपुरवडे ते दोधनपाडा रोडवर घटना घडली. जिभाउ देवरे हे स्प्लेंडर मोटारसायकल क्र.एम.एच.४१, क्यू.१४६८ वरून भिमाशंकर येथे विहिरीवरील मोटर चालू करण्यासाठी जात असताना आरोपी क्र.१ शेतात बारा देण्याचे काम करीत होता. त्याने जिभाउ यांना अडवून “हा रस्ता तुझ्या बापाचा आहे का, इकडून जाऊ नको, नाहीतर पावडीने मारून टाकीन” अशी धमकी दिली. त्यावेळी आरोपी क्र.२ तेथे येऊन शिवीगाळ करून रस्त्यावर काटे टाकले. आवाज ऐकून साक्षीदार व त्याचे भाऊ पुंडलीक व निवृत्ती घटनास्थळी गेले. तेथे आरोपी क्र.१ पावडी घेऊन जिभाउ यांच्यावर धावला होता. साक्षीदाराने समजावून भांडण मिटवून जिभाउ यांना घरी आणले. आरोपींनी रस्ता बंद केला. नंतर जिभाउ यांनी जायखेडा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली व पोलिसांनी साक्षीदाराचा जबाब नोंदविला होता असे कथन केले आहे.

११. त्याच्या उलटतपासात मान्य केले की, आरोपी व साक्षीदार यांच्यात सामाईक बांध आहे, त्याची शेती उंचावर असून आरोपींची शेती खाली आहे, सामाईक बांधावर काटेरी झाडे लावलेली होती व त्या झाडांच्या फांद्या आरोपीच्या पिकात जात होत्या, त्या फांद्या काढण्यावरून दोन्ही पक्षांत वाद झाला होता. तसेच त्याने असेही मान्य केले की, त्याने सांगितलेल्या रस्त्याची रुंदी साधारण १२ फूट आहे व त्या

रस्त्याने दोधनपाडा गावातील अनेक लोक ये–जा करतात, तसेच तो रस्ता वरदळीचा आहे. श्रीपुरवडे गाव व त्याचे शेत यामध्ये साधारण एक किलोमीटर अंतर आहे. तसेच त्याने मान्य केले की, त्याचा जबाब पोलिसांनी त्याला वाचून दाखविला होता. पोलिसांना दिलेल्या जबाबात आरोपींनी दादाजी भिका अहिरे यांच्या शेतातील रस्त्यावर काटे टाकल्याचे नमूद आहे. तसेच आरोपींनी वडे खुर्द ते दोधनपाडा (भिमाशंकरमार्गे) या एकाच रस्त्यावर काटे टाकले होते. आरोपी ज्या शेतात काम करीत होता त्या शेताचा गट क्रमांक २४ आहे असे कथन केले आहे.

**१२.** पुंडलिक सोमसिंग देवरे (सा.क्र.०३) याच्या पुराव्यात असे आले की, फिर्यादी त्याचा भाऊ असून आरोपी त्याचे नातेवाईक आहेत. त्यांची शेती वडे खुर्द शिवारात आहे. सन २०१७ मध्ये फिर्यादी जिभाऊ हे भिमाशंकर शिवारात शेतात मोटर चालू करण्यासाठी गेले असता, आरोपी गुलाब यांनी त्यांना “इथून जाऊ नको, तुझ्या बापाचा रस्ता आहे का” असे म्हटले. त्यावेळी भांडणाचा आवाज ऐकून तो व इतर जण घटनास्थळी गेले. त्यावेळी आरोपींनी जिभाऊ यांना शिवीगाळ करून मारहाण केली होती. त्यानंतर फिर्यादीने घटनेबाबत पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. सदर प्रकरणी पोलिसांनी त्याची विचारपूस करून त्याचा जबाब नोंदविला होता असे कथन केले आहे.

**१३.** त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, त्यांची व आरोपी गुलाब यांची शेती बांधाला बांध लागून आहे, त्यांची शेती उंचावर असून गुलाबची शेती खाली आहे. दोन्ही शेतांच्या बांधाच्या उतारावर काटेरी झुडपे आहेत व त्या उताराची झिज होऊ नये म्हणून त्यांनी गुलाब यांना ती झुडपे तोडू दिली नाहीत, या बांधावरून त्याच्यात व गुलाब यांच्यात वाद आहे. साक्षीदाराने असेही मान्य केले की, वडे खुर्द ते भिमाशंकर जाणारा रस्ता सार्वजनिक असून त्या रस्त्याने अनेक शेतकरी ये–जा करतात. भांडण झाले त्यावेळी तो घरी होता व घटना त्याच्या समोर घडलेली नाही, त्याच्या समोर कोणतीही मारहाण झालेली नाही असे मान्य केले आहे. तसेच त्याला वाचता येत नाही व त्याच्या जबाबातील मजकूर त्याने स्वतः वाचलेला नाही तसेच तो मजकूर त्याला कोणीही वाचून दाखवलेला नाही असे देखील मान्य केले आहे.

**१४.** फिर्यादी जिभाऊ सोमसिंग देवरे (सा.क्र.०४) याच्या पुराव्यात असे आले की, आरोपी त्याचे नातेवाईक असून रस्त्याच्या कारणावरून त्यांच्यात वाद झाला होता. त्यावेळी आरोपींनी रस्ता अडवून त्याला व त्याच्या भावाला शिवीगाळ व मारहाण

केली होती, त्याबाबत त्याने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती असे मान्य केले आहे. मात्र त्याच्या उलटतपासात त्याने मान्य केले की, आरोपी व त्यांच्यात समजूत झाली असून त्याला केस चालवायची नाही. तसेच आरोपी व त्यांच्यात दिवाणी केसेस चालु असल्यामुळे रागाच्या भरात त्याने फिर्याद दिली होती असेही त्याने कबूल केले आहे. तसेच आरोपी व फिर्यादी यांच्यात किरकोळ बोलाचाली झाली होती, मारामारी झाली नव्हती व फिर्यादीतील मजकूरही त्याला माहित नव्हता असे देखील त्याने मान्य केले आहे.

**१५.** पटलावरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी पक्षाचे साक्षीदार दिपक निंबा मोरे (सा.क्र.१) यांनी केवळ घटनास्थळी रस्त्यावर काटे टाकलेले व मोटारसायकल उभी असल्याचे सांगितले असून, त्यांना घटनास्थळाच्या चतुःसीमा सांगता आलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या साक्षीवरून आरोपींनी जाणीवपूर्वक बेकायदेशीररित्या रस्ता अडविला किंवा फिर्यादीस प्रतिबंध केला हे निर्विवादपणे सिद्ध होत नाही. तसेच कृष्णा सोमसिंग देवरे (सा.क्र.२) व पुंडलिक सोमसिंग देवरे (सा.क्र.३) यांच्या साक्षीतून आरोपी व फिर्यादी यांच्यात सामाईक बांध, काटेरी झुडपे व शेताच्या उतारावरून पूर्वीपासून वाद असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर घटना ही पूर्वीच्या शेतजमिनीच्या वादातून उद्भवलेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**१६.** सा.क्र.२ व सा.क्र.३ यांनी दिलेल्या साक्षीत महत्त्वपूर्ण विसंगती आढळून येतात. सा.क्र.२ यांनी आरोपींनी रस्त्यावर काटे टाकल्याचे सांगितले असले तरी, सा.क्र.३ यांनी घटना स्वतःच्या समक्ष घडलेली नसल्याचे व त्यांच्या समोर कोणतीही मारहाण झालेली नसल्याचे स्पष्ट मान्य केले आहे. तसेच फिर्यादीने सांगितलेला रस्ता हा सार्वजनिक व वरदळीचा असल्याचे दोन्ही साक्षीदारांनी मान्य केले आहे. अशा परिस्थितीत आरोपींनी फिर्यादीस एकट्यालाच जाणीवपूर्वक अडविले किंवा सार्वजनिक रस्ता कायमस्वरूपी बंद केला असे ठोसपणे सिद्ध होत नाही. शिवाय, स्वतंत्र व निष्पक्ष साक्षीदारांचा अभाव असून, सर्व साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक असल्याने त्यांच्या साक्षीकडे सावधगिरीने पाहणे आवश्यक आहे.

**१७.** महत्त्वाचे म्हणजे, फिर्यादी जिभाऊ सोमसिंग देवरे (सा.क्र.४) यांनी स्वतःच्या उलटतपासात आरोपींसोबत समजूत झाल्याचे, रागाच्या भरात फिर्याद दिल्याचे तसेच प्रत्यक्षात कोणतीही मारामारी झाली नसल्याचे स्पष्ट कबूल केले आहे.

तसेच फिर्यादी व आरोपी यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. त्याबाबत त्यांनी संयुक्त पुरसीस निशाणी २९ दाखल केली आहे. तसेच फिर्यादीचा व इतर साक्षीदारांचा पुरावा देखील आरोपींविरुध्दचा गुन्हा शाबीत करण्याकरीता पुरेसा ठरलेला नाही. पटलावरील उपलब्ध पुराव्या वरुन आरोपींनी फिर्यादीला शेतात जात असतांना रस्त्यात अडवुन काटे टाकले, शिवीगाळ करुन अपमानीत केले व फौजदारीपात्र धाकदपटशा केल्या इत्यादी बाबी संशयाचे पलिकडे जावुन सिध्द होत नाहीत. सबब, मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ चे निष्कर्ष **नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दे क्र.०४ करीता</u>** :–

**१६.** मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ च्या निष्कर्षावरुन अभियोग पक्ष आरोपींवरील दोषारोप सिध्द करु शकला नसल्याने आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत वाटते. सबब, मी मुद्दा क्रमांक ०४ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. आरोपी नं.१ व २ नामे, **गुलाब त्र्यंबक देवरे व वंदना ऊर्फ शोभा गुलाब देवरे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३४१, ५०४, ५०६ सह कलम ३४ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी दिलेले बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत अपील कालावधीपर्यंत ग्राह्य राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

UDAY PRAKASH HINGMIRE
Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2026.05.13 17:59:39 +0530

**दिनांक – १३.०५.२०२६.**

**( यु. पी. हिंगमिरे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.२,**
**सटाणा.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer (Grade-III) | : | Pratik S. Kale. |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. |
| Date of Order/Judgment | : | 13.05.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 13.05.2026. |
| Order uploaded on | : | 13.05.2026. |